प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

9 जानेवारी 2015

**ठेवीदारांच्या शिक्षण व जाणीव निधी मधून वित्तीय मदत मिळवू इच्छिणा-या संस्थांसाठीच्या निकषावरील आरबीआय द्वारे मार्गदर्शक तत्वे प्रसृत**

भारतीय रिझर्व बँकेने आज तिच्या वेबसाईटवर, ठेवीदारांच्या शिक्षण व जाणीव निधी (हा निधी) मधून वित्तीय मदत मिळविण्याबाबत, संस्था, संघ व संस्थांच्या पंजीकरणासाठीच्या निकषांवरी मार्गदर्शक तत्वे प्रसृत केली आहेत.

**महत्वाची लक्षणे**

**उद्दिष्टे व कार्यकृतींची व्याप्ती** : बँकेच्या ठेवीदारांचे शिक्षण व जाणीव ह्यांना प्रोत्साहन देण्याबाबतच्या निरनिराळ्या कार्यकृती करण्यासाठी संस्था/कंपन्या/संघ ह्यांना वित्तीय मदत देणे.

**पात्र असलेल्या संस्था** : अशा संस्था/कंपन्या/संघ (उदा. ना नफा तत्वावरील सार्वजनिक धर्मादाय ट्रस्ट्स, कॉर्पोरेट्स, विद्यालये) की ज्या, बँक ठेवीदारांचे शिक्षण व जाणीव संबंधित कार्यकृतींमध्ये आधीपासूनच कार्यरत आहेत, किंवा ठेवीदारांच्या शिक्षण कार्यक्रम, वादविवाद सत्रे, चर्चासत्रे इत्यादी (संशोधन कार्यकृतींसह) आयोजित करण्याचे प्रायोजन करत आहेत अशांना मदतीसाठी विचारात घेतले जाऊ शकते.

**अर्ज करण्याची रीत** : अशा संस्थांनी, ह्या मार्गदर्शक तत्वांच्या जोडपत्रात विहित केलेल्या नमुन्यात व अर्जात निर्देशित केलेल्या यादीनुसार आवश्यक ते कागदपत्र/माहिती ह्यासह, मुख्य महाव्यवस्थापक, बँकिंग रेग्युलेशन विभाग, भारतीय रिझर्व बँक, केंद्रीय कार्यालय, 12 वा मजला, केंद्रीय कार्यालय इमारत, शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई 400 001 ह्यांचेकडे अर्ज करावा. पहिल्या फेरीत, फेब्रुवारी 27, 2015 व्यवहार बंद होईपर्यंत वरील पत्त्यावर अर्ज स्वीकारले जातील.

**पार्श्वभूमी**

बँकिंग कायदे (सुधारणा), 2012 मधील सुधारणेनंतर, बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, 1949 मध्ये कलम 26 ए टाकण्यात आले त्या कलमान्वये, रिझर्व बँकेला, ठेवीदारांचे शिक्षण जाणीव निधी (निधी) स्थापन करण्याचा अधिकार देण्यात आला. त्यानुसार, रिझर्व बँकेने, जानेवारी 21, 2014 रोजी, तिच्या वेबसाईटवर, जनतेकडून मते घेण्यासाठी, प्रारुप ठेवीदार शिक्षण व जाणीव निधी योजना, 2014 (ही योजना) प्रदर्शित केली. ह्या प्रारुप निकषांवरील मते व सूचनांवर आधारित ही योजना तयार करण्यात आली व मे 24, 2014 रोजी अधिकृत राजपत्रात अधिसूचित करण्यात आली. ठेवीदारांच्याच हितसंबंधासाठी ह्या योजनेमध्ये, संस्था, कंपन्या किंवा संघ ह्यांचे पंजीकरण, व त्यांना वित्तीय अनुदान देणे समाविष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार, ह्या योजनेखाली, ह्या निधीमधून वित्तीय अनुदान देण्यासाठी, संस्था, कंपन्या व संघ ह्यांचे पंजीकरण करण्यासाठीचे प्रारुप निकष तयार करण्यात आले असून, ऑक्टोबर 28, 2014 रोजी ते जनतेकडून मते-मतांतरे मागविण्यासाठी प्रसृत करण्यात आले. ह्या प्रारुप निकषांबाबत मिळालेली मते व सूचनांच्या आधाराने, ह्या निधीमधून वित्तीय अनुदान मिळविण्यासाठी, संस्था, कंपन्या व संघ ह्यांच्या पंजीकरणाच्या निकषांवरील मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आली.

**अल्पना किल्लावाला**

प्रधान मुख्य महाव्यवस्थापक

**वृत्तपत्रासाठी निवेदन : 2014 -2015/1453**

**ठेवीदार शिक्षण व जाणीव निधीमधून वित्तीय मदत मिळविण्यासाठी, संस्था, कंपन्या संघ ह्यांच्या पंजीकरणाबाबतच्या निकषांवरील मार्गदर्शक तत्वे.**

**(1) पार्श्वभूमी**

बँकिंग कायदे (सुधारणा), 2012 मधील सुधारणेनंतर, बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, 1949 मध्ये कलम 26 ए टाकण्यात आले त्या कलमान्वये, रिझर्व बँकेला, ठेवीदारांचे शिक्षण जाणीव निधी (निधी) स्थापन करण्याचा अधिकार देण्यात आला. त्यानुसार, रिझर्व बँकेने, जानेवारी 21, 2014 रोजी, तिच्या वेबसाईटवर, जनतेकडून मते घेण्यासाठी, प्रारुप ठेवीदार शिक्षण व जाणीव निधी योजना, 2014 (ही योजना) प्रदर्शित केली. ह्या प्रारुप निकषांवरील मते व सूचनांवर आधारित ही योजना तयार करण्यात आली व मे 24, 2014 रोजी अधिकृत राजपत्रात अधिसूचित करण्यात आली.

(2) हा निधी निर्माण करण्यात आला असून, सर्व बँकांना (प्रादेशिक ग्रामीण बँका व स्थानिक क्षेत्रीय बँका/नागरी सहकारी बँका/राज्य सहकारी बँका/जिल्हा केंद्रीय सहकारी बँकांसह अनुसूचित वाणिज्य बँका) सांगण्यात आले आहे की, त्यांनी, दहा वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळ हक्क न सांगितल्या गेलेल्या किंवा कोणताही व्यवहार न केला गेलेल्या अशा अकार्यकारी खात्यांमधील ठेवी किंवा दहा वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळ हक्क न सांगितलेल्या ठेवी, ह्या योजनेच्या परिच्छेद 3(7) मध्ये दिल्यानुसार, ह्या निधीमध्ये हस्तांतरित कराव्यात. त्याचप्रमाणे, प्रत्येक कॅलेंडर महिन्यात देय होत असलेल्या रकमाही (म्हणजे अकार्यकारी खात्यामधील रकमा व दहा वर्षे किंवा त्याहून अधिक काळ हक्क न सांगितल्या गेलेल्या शिल्लका), तसेच पुढील महिन्याच्या शेवटच्या कामकाजाच्या दिवशी त्यावर उपार्जित होणारे व्याजही, ह्या योजनेत विहित केल्यानुसार ह्या निधीमध्ये हस्तांतरित करावे.

(3) हा निधी ठेवीदारांचे हितसंबंध वाढविण्यासाठी, व रिझर्व बँकेने वेळोवेळी विहित केल्यानुसार ठेवीदारांचे हितसंबंध वाढविण्यास आवश्यक असलेल्या कामांसाठी वापरला जाईल. हक्क न सांगितलेल्या ठेवीच्या रक्कमा ह्या निधीमध्ये हस्तांतरित केल्या गेल्या नंतरही, ठेवीदार, त्याच्या बँकेकडून ह्या ठेवीवर दहा वर्षानंतर हक्क सांगु शकेल किंवा ते खाते चालवू शकेल. ठेवीदाराला, त्या ठेवीची रक्कम देण्यास बांधील राहील, व अशा रकमेचा परतावा ह्या निधीमधून मिळविण्यास पात्र असेल.

(4) ह्या योजनेनुसार ह्या निधीचे व्यवस्थापन व प्रशासन करण्यासाठी, परिच्छेद 8(1) अन्वये, एक समिती स्थापन केली जाणे आवश्यक आहे. ह्या योजनेच्या परिच्छेद 11(1) स्पष्ट करतो की, ठेवीदारांचे हितसंबंध जपण्यासाठी, अशी समिती, वेळोवेळी, बँकेच्या ठेवीदारांसाठी कार्यक्रम ठेवणा-या, चर्चासत्रे, वादविवाद सत्रे आयोजित करणा-या व ह्या क्षेत्रांशी संबंधित संशोधन कृती करणा-या संस्थांसह, ठेवीदारांमधील जाणीव व शिक्षण ह्याबाबतच्या कार्यकृती करणा-या संस्था किंवा संघ ह्यांना मान्यता देऊ

शकते/पंजीकृत करु शकते. ह्याशिवाय, ह्या योजनेच्या परिच्छेद 11(3) अनुसार, ही समिती, संस्था, कंपन्या व संघ ह्यांना वित्तीय सहाय्य देण्यासाठी असलेले निकषही ठरवू शकते. त्यानुसार, ह्या योजनेखाली, ह्या निधीमधून वित्तीय अनुदान देण्यासाठी, संस्था, कंपन्या व संघ ह्यांचे पंजीकरण करण्यासाठीचे प्रारुप निकष तयार करण्यात आले असून, ऑक्टोबर 28, 2014 रोजी ते जनतेकडून मते-मतांतरे मागविण्यासाठी प्रसृत करण्यात आले. ह्या प्रारुप निकषांबाबत मिळालेली मते व सूचनांच्या आधाराने, ह्या निधीमधून वित्तीय अनुदान मिळविण्यासाठी, संस्था, कंपन्या व संघ ह्यांच्या पंजीकरणाच्या निकषांवरील मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आली.

**2. मार्गदर्शक तत्वे**

**(1) पंजीकरणासाठी पात्र संस्था**

(अ) पंजीकरणासाठी पुढील संस्थांचा विचार केला जाईल

बँक-ठेवीदारांचे शिक्षण, जाणीव ह्याबाबत आधीच कार्यरत असलेल्या किंवा ठेवीदारांसाठी शैक्षणिक कार्यक्रम प्रायोजित करु इच्छिणा-या (संशोधन कार्यासह) संस्था/कंपन्या/संघ विचारात घेतले जाऊ शकतात.

(ब) अशा संस्था/कंपन्या/संघ पुढीलप्रमाणे असू शकतात.

(अ) सार्वजनिक धर्मादाय संस्था म्हणून स्थापन झालेली

(ब) सोसायट्या पंजीकरण अधिनियम 1860 (1860 चा 21) खाली, किंवा भारताच्या कोणत्याही भागात, त्या अधिनियमास धरुन असलेल्या कोणत्याही कायद्याखाली पंजीकृत झालेली

(क) राज्य सहकारी सोसायट्या अधिनियमांखाली पंजीकृत झालेली

(ड) कंपन्या अधिनियम, 1956 (1956 चा 1) च्या कलम 25 खाली किंवा कंपन्या अधिनियम 2013 (2013 चा 8) च्या कलम 8 खाली पंजीकृत झालेली

(ई) कायद्याने स्थापन झालेले विद्यालय

(फ) सरकारने किंवा कायद्याने स्थापन झालेले विद्यालय किंवा कायद्याने स्थापन झालेल्या विद्यालयाशी संलग्न असलेले कोणतेही विद्यालय

(ग) सरकारने किंवा एखाद्या स्थानिक प्राधिकरणाने संपूर्णतः किंवा अंशतः अर्थसहाय्य केलेली एखादी संस्था किंवा

(ह) केंद्र सरकारच्या सशस्त्र दलाने, अशा दलाच्या आजी किंवा माजी सभासदांसाठी किंवा त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांसाठी स्थापन केलेला रेजिमेंटल किंवा अ-सार्वजनिक निधी.

**(2) उद्दिष्टे**

संस्था/कंपन्या/संघ ह्यांना, बँक ठेवीदारांचे शिक्षण व जाणीव वाढविण्यासाठी कार्यकृती करण्यास किंवा ठेवीदारांसाठी शिक्षण कार्यक्रम, चर्चासत्रे, वादविवाद सत्रे (संशोधन कार्यासह) आयोजित करण्यास वित्तीय सहाय्य करणे.

**(3) पात्र असलेल्या संस्थांद्वारे पूर्ण करावयाच्या अटी**

(अ) अशा संस्था/कंपन्या/संघ ह्यांचेकडे, त्या संस्था/कंपन्या/संघ ह्यांचे प्रशासन व व्यवस्थापन करण्यासाठी, नियम, विनियम आणि/किंवा पोट नियम असले पाहिजे. असे नियम, विनियम, आणि/किंवा पोट नियम हे, पंजीकरणाच्या अटींना धरुन असले पाहिजेत. अशा संस्था/कंपन्या/संघांवर नियंत्रण मंडळ/व्यवस्थापन समितीचे नियंत्रण असेल. ह्याशिवाय, अशा संस्था/कंपन्या/संघांच्या पोट नियमांमध्ये, “धर्मादाय उद्देश” सोडून अन्य हेतूंसाठी त्यांचे उत्पन्न किंवा अॅसेट्स वापरले न जाण्याची तरतुद असली पाहिजे.

(ब) अशा संस्था/कंपन्या/संघामध्ये किमान 20 सभासद असावेत आणि त्यांची पूर्व कामगिरी स्वच्छ असावी. कंपनीज अधिनियम 1956 च्या कलम 25 खाली किंवा कंपनीज अधिनियम 2013 च्या कलम 8 खाली पंजीकरण झालेल्या कंपन्यांसाठी 20 सभासद/भाग धारकाव्यतिरिक्त, वेगवेगळ्या प्रकारचे सम भाग धारण, तीन स्वतंत्र संचालक, चांगल्या प्रकारचे कॉर्पोरेट प्रशासन व ऑडिट समिती असणे आवश्यक आहे. ही आवश्यकता अर्जदार कंपनीच्या किंवा तिला प्रायोजित कंपनीला लागु केली जावी.

(क) अशा संस्था/कंपन्या/संघ, समितीने ह्याबाबतीत खास सूट दिली नसल्यास, पंजीकरणासाठी अर्ज केल्याच्या तारखेपूर्वी किमान 5 वर्षे अस्तित्वात असल्या पाहिजेत. ह्या 5 वर्षांपैकी, त्या संस्थांनी, ग्राहक संरक्षण/जाणीव क्षेत्रामध्ये गेली तीन वर्षे कामगिरी केली असली पाहिजे.

**(4) कार्यकृतींची व्याप्ती**

ठेवीदार शिक्षण व जाणीव निधीद्वारा, वित्तीय मदत दिली जाण्यासाठीच्या कार्यकृती पुढील प्रमाणे आहेत

(1) वित्तीय साक्षरतेचे फायदे, निरनिराळ्या वाहिन्यांवर उपलब्ध असलेल्या निरनिराळ्या उत्पादांची माहिती, मान्यताप्राप्त ठेवीदार संघ/एनजीओ ह्यांच्या साह्याने नोंदणीकरण व प्रत्यक्ष खाते उघडण्याची रीत/शिष्टाचार समजावून सांगणे ह्याबाबत, समाजाच्या दुर्लक्षित क्षेत्रातील लोकांना, शिक्षण देण्यासाठी किंवा जाणीव करुन देण्यासाठी, कार्यक्रम/प्रसंग आयोजित करणे.

(2) सुरक्षित व निश्चित बँकिंग सह वित्तीय साक्षरता देण्यासाठी, ठेवीदार/ठेवीदारांचे संघ ह्यांचेसाठी चर्चासत्रे, व मेळावे आयोजित करणे.

(3) ठेवीदारांचे शिक्षण, हक्कांची जाणीव ह्याबाबतचे प्रकल्प व संशोधन कार्याला अर्थसहाय्य करणे.

(4) ठेवीदारांच्या जाणीवेसाठी आयोजित केलेली प्रदर्शने, सेमिनार्स, टाऊन हॉलमधील कार्यक्रम, प्रसार कार्यक्रम ह्यामध्ये वाटण्यासाठीचे साहित्य तयार करणे/मिळविणे.

(5) वित्तीय साक्षरता, ग्राहक संरक्षण इत्यादिच्या माध्यम-मोहिमा सुरु करणे.

(6) ग्राहक संरक्षता/जाणीव संबंधाने इतर कार्यक्रम.

बी आर अधिनियम 1949 च्या कलम 26 ए(4) अन्वये असलेली ही केवळ एक निर्देशक यादी आहे आणि ह्या निधीची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, रिझर्व बँक, तिला वेळोवेळी योग्य वाटतील अशा कार्यकृतींचाही ह्यात समावेश करु शकते.

**(5) प्रकल्पाची योजना व वित्तीय सहाय्य**

बँक ठेवीदारांचे शिक्षण व जाणीव ह्यावरील सफलताक्षम प्रकल्प/प्रस्ताव असलेली, पंजीकृत संस्था/कंपनी/संघ ह्या योजनेमधून सहाय्य प्राप्त करण्यास पात्र असू शकते. पंजीकृत असलेल्या संस्थांनी, त्यांचे प्रायोजित प्रकल्प तसेच त्या प्रकल्पांचा अंदाजे खर्च, आवश्यक असलेले सहाय्य ह्यासह अर्थसहाय्यासाठी अर्ज करावा.

प्रायोजित केलेल्या कार्यकृतीवर अवलंबून, ह्या समितीने मान्यता दिलेल्या/पंजीकृत केलेल्या संस्था किंवा कंपन्या किंवा संघ ह्यांचा विचार, एकदाच किंवा टप्प्या-टप्प्याने भरपाईच्या स्वरुपात अनुदान तत्वावर केला जाईल.

**(6) इतर अटी**

(अ) ही संस्था/कंपनी/संघ, एखादा विशिष्ट समाज, धर्म, जमात किंवा जात ह्यांच्या लाभासाठी नसावी.
(ब) संस्था/कंपन्या/संघ ह्यांनी एक घोषणापत्र द्यावे की, ह्या निधीकडून मिळालेला पैसा, त्यांच्याकडून

केवळ रिझर्व बँक/हा निधी ह्यांनी परवानगी दिलेल्या कामांसाठी आणि त्याबाबत असलेल्या खर्चासाठीच वापरला जाईल - अन्य कोणत्याही कामांसाठी नाही.

(क) संस्था/कंपन्या/संघ ह्यांनी घोषणापत्र द्यावे की, त्यांच्याद्वारे, हा निधी/रिझर्व बँक ह्यांना, ह्या निधीमधून मिळालेल्या अनुदानांची व त्याबाबतच्या खर्चाची त्यांनी ठेवलेली लेखा पुस्तके उपलब्ध करुन दिली जातील.

(ड) ह्या निधीमधून वित्तीय सहाय्य मिळालेल्या संस्था/कंपन्या/संघ ह्यांनी, ठेवीदार शिक्षण व जाणीव कार्यकृतींसाठी त्यांनी केलेल्या खर्चाचा, चार्टर्ड अकाऊंटंटने प्रमाणित केलेला अहवाल सादर केला जाईल.

**(7) देखरेख**

पंजीकरण केल्यानंतर, संस्था/कंपन्या/संघ ह्यांच्या कार्यकृतींवर देखरेख ठेवली जाईल. ह्या संस्था/कंपन्या/संघ ह्यांनी केलेल्या कार्यकृती, रिझर्व बँकेने परवानगी दिलेल्या कार्यकृतीनुसार नसल्यास, ही समिती त्या संस्थेचे/कंपनीचे/संघाचे पंजीकरण रद्द करेल आणि ह्या बाबतीत ह्या समितीचा निर्णय अंतिम असेल. दिलेल्या निधीच्या बाबतीत, ही समिती तिला योग्य वाटेल अशी कारवाई करील व त्यात आवश्यक वाटल्यास कायदेशीर कारवाईही समाविष्ट असेल.

**(8) अर्ज करण्याची रीत**

जोडपत्रात दिलेल्या नमुन्यामध्ये अर्ज करणे आवश्यक आहे. ह्याशिवाय, अर्जाच्या फॉर्ममध्ये निर्देशित केल्याप्रमाणे, समभाग धारण साचा, सभासदत्व, वित्तीय विवरणपत्रे गेल्या 5 वर्षात राज्य/केंद्र सरकारकडून मिळालेल्या मंजु-या/अनुदाने इत्यादि पुष्ट्यर्थ कागदपत्रे/माहिती दिली जावी. इतर माहितीसह पंजीकरणासाठीचे अर्ज पुढील पत्त्यावर पाठवावेत.

मुख्य महाव्यवस्थापक,
बँकिंग रेग्युलेशन विभाग,
भारतीय रिझर्व बँक, केंद्रीय कार्यालय,
12 वा मजला, केंद्रीय कार्यालय इमारत,
शहीद भगतसिंग मार्ग,
मुंबई 400 001.

सुरुवातीच्या टप्प्यात वरील पत्त्यावर, फेब्रुवारी 27, 2015 रोजी कामकाज संपेपर्यंत अर्ज स्वीकारले जातील. पंजीकरण करण्यामधील अनुभव मिळाल्यानंतर सातत्याने अर्ज स्वीकारले जातील. तथापि, ह्या मार्गदर्शक तत्वांचे पुनरावलोकन व सुधारणा नियतकालिकतेने केली जाऊ शकते.

**(9) समितीच्या निर्णयाची कार्यरीत**

**(अ) पंजीकरणाचे वेळी समिती पुढील कार्यकृती करील**

(1) अर्जदाराची प्रथम दर्शनी पात्रता ठरविण्यासाठी अर्जांची छानननी केली जाईल आणि अर्जांची सुयोग्यता ठरविण्यासाठी अतिरिक्त निकष लावले जाऊ शकतात.

(2) अशा अर्जदारांच्या अर्हतेचे मूल्यमापन करण्यासाठी, ह्या निधीमधून सहाय्य मिळवू इच्छिणा-या संस्था/कंपन्या/संघांच्या ऑडिट केलेल्या लेखा व मागील 5 वर्षांचे अहवाल विचारात घेतले जातील आणि अशा अर्जदारांच्या इतर कार्यकृतींची तपासणी केली जाईल.

(3) तो अर्जदार पंजीकरणासाठी योग्य आहे काय हे ठरविण्यासाठी, रिझर्व बँकेच्या प्रादेशिक कार्यालयांसह इतर प्राधिकरणांकडे योग्य वाटल्यास चौकशी करील. (4) अर्जांची प्राथमिक छानननी करण्याचे काम एका छानननी समितीकडे सोपवील आणि अशा समितीमध्ये, ह्या समितीत नसलेले सभासदही असू शकतील.

**(ब) वित्तीय मदत देतेवेळी ही समिती पुढील कार्यकृती करील**

(1) निधी देणे प्राधिकृत करण्यापूर्वी, प्रस्ताव व देण्यात येणा-या अनुदानांचा व सहाय्याचा अंतिम उपयोग तपासून पाहील.

(2) अशा संस्था/कंपन्या/संघांना आधीच दिलेल्या निधीच्या अंतिम उपयोगाबाबत पडताळणी करील किंवा अधिक माहिती मागतील.

(3) रिझर्व बँकेच्या प्रादेशिक कार्यालयासह इतर प्राधिकरणांकडेही, प्रस्तावित प्रकल्प हा, ह्या योजनेला पुढे नेणाराच आहे ह्याबाबत खात्री करण्यासाठी, योग्य वाटतील अशा चौकशा करील.

**(10) पंजीकरण व वित्तीय सहाय्याचे प्रदान**

(अ) संस्था/कंपन्या/संघ ह्यांचे पंजीकरण व त्यानंतर त्यांना करावयाचे निधी वाटप ही दोन टप्प्यांची प्रक्रिया असेल, आणि ती वेगवेगळीच समजली जावी. पंजीकरण झाल्यानंतर, निधीचे प्रकल्पांच्या धर्तीवर वाटप केले जाईल, आणि ही देखील एक वेगळी प्रक्रिया असेल.

(ब) ठेवीदारांचे शिक्षण व जाणीव ह्यावरील सफलताक्षम प्रकल्प असलेल्या व पंजीकृत झालेल्या संस्था/कंपन्या/संघ, ह्या निधीमधून सहाय्य मिळविण्यास पात्र असू शकतात. तथापि, केवळ पंजीकरण झाले आहे म्हणून, कोणतीही संस्था/कंपनी/संघ ह्या निधीमधून वित्तीय सहाय्य मिळविण्यास आपोआपच पात्र ठरतो असे नाही.

(क) पारदर्शकतेची खात्री असण्यासाठी, पंजीकृत झालेल्या संस्था/कंपन्या/संघांची नावे आरबीआयच्या वेबसाईटवर टाकली जातील.